# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 24.04.2025** **वार- गुरुवार**

---

**संतोषजगदाळे,कौस्तुभगणबोटे**

पहलगाम मध्ये दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या, पुण्यातल्या संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गनबोटे या पर्यटकांच्या पार्थिवावर आज सकाळी वैकूंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या दोघांचंही पार्थिव आज पहाटे विशेष विमानानं पुण्यात आणण्यात आलं. यावेळी राजकीय नेते आणि नागरिक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**पर्यटकसुरक्षित**

पहेलगाम मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर तिथे अडकलेले ,पिंपरी चिंचवड मधले सुमारे 32 पर्यटक सुखरूप असल्याची माहिती पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी दिली. आयुक्तांनी जम्मू काश्मीरमधील संबंधित यंत्रणेशी संपर्क साधत या पर्यटकांविषयी माहिती घेतली. अतिरिक्त पोलीस महासंचालक मनीष सिन्हा यांच्याशी संपर्कात असून शहरातील पर्यटकांना सर्वतोपरी मदत करण्याचं आश्वासन त्यांनी दिल्याची माहिती आयुक्त चौबे यांनी दिली.

**टपाल**

भारतीय टपाल विभागातर्फे आता पुण्यात 24 तास स्पीड पोस्ट , पार्सल बुकिंग सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. पुणे रेल्वे स्टेशन जवळ प्लॅटफॉर्म क्रमांक एक च्या शेजारी स्पीड पोस्ट, आंतरराष्ट्रीय स्पीड पोस्ट, आंतरराष्ट्रीय रजिस्टर पोस्ट ,आणि आंतरराष्ट्रीय पार्सल बुकिंग सेवा देण्यात येणार आहे. रविवार किंवा सार्वजनिक सुट्टी त्या दिवशी पण हे काउंटर सुरू राहणार आहे. या विभागात सकाळी १० ते २ या वेळेत आधार कार्ड च्या सुविधांसाठी एक काउंटर लावण्यात आलं आहे. नागरिकांनी या सेवांचा अवश्य लाभ घ्यावा असं आवाहन अधीक्षक बाळकृष्ण एरंडे यांनी केलं आहे.

**वाहतूकसमस्या**

पुणे शहराच्या ईशान्य भागातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेनं विमानतळ क्षेत्र एकात्मता आराखड्यासह नगर रस्त्याचा सर्वंकष मोबिलिटी प्लॅन तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. या भागाला भेडसावणाऱ्या रहदारीच्या समस्येवर दीर्घकालीन उपाय शोधण्यासाठी महापालिका सल्लागार नेमणार आहे. खासगी वाहनांची झपाट्याने होणारी वाढ, शहरी भागाचा विस्तार आणि अपुऱ्या वाहतुकीच्या पायाभूत सुविधांमुळे, पुण्यात वाहतुकीची समस्या निर्माण झाली आहे.

**सीमाभिंत**

पुणे शहरातील नाले आणि नाल्याजवळील सोसायट्यांच्या सीमा भिंती बांधण्यासाठी राज्य सरकारनं पुणे महापालिकेला २०० कोटी रुपये देण्याचे जाहीर केले होते. मात्र सहा महिने होउनही हा निधी मिळाला नसल्यानं प्रशासनानं या सर्व निविदा रदद् केल्या आहेत. पुण्यात २०१९ मध्ये झालेल्या ढगफुटीत आंबिल ओढ्याला पूर आला होता. यामध्ये अनेक सोसायट्यांच्या सीमा भिंती पडल्या होत्या. तर २० पेक्षा अधिक जणांचा बळी गेला होता. त्यानंतर महापालिकेने आंबिल ओढ्याच्या दोन्ही बाजूने संरक्षण भिंतीसह नवीन पूल बांधण्याचे काम हाती घेतले होते.

**दूषितपाणी**

इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्यातून शहरातील नागरिकांना दुषित पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारींची दखल घेऊन, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनी चिखली इथल्या जलशुद्धीकरण केंद्र आणि निघोजे बंधाऱ्याला भेट दिली. यावेळी त्यांनी शहराला स्वच्छ पाणी पुरवठा करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. बंधाऱ्यातील जलपर्णी तातडीने काढण्याच्या तसंच बंधाऱ्याचं अपूर्ण काम तातडीनं पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी पाटबंधारे विभागाला दिल्या.

**<u>बालकुमारचित्रपटमहोत्सव</u>**

पुण्यात आजपासून सुरू झालेल्या बालकुमार चित्रपट महोत्सवाचं उद्घाटन दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर, उद्योजक कृष्णकुमार गोयल यांच्या उपस्थितीत आणि लहान मुलांच्या हस्ते आकाशात फुगे सोडून झालं. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी 'शिवरायांचा छावा' हा चित्रपट दाखवण्यात आला.संवाद, पुणे, कोहिनूर ग्रुप आणि कावरे आईस्क्रीम यांच्या संयुक्त विद्यमानं हा महोत्सव ३० एप्रिल पर्यंत सुरू राहणार आहे.

**<u>पुरस्कार</u>**

अखिल भारतीय स्वाभिमानी संघर्ष सेनेचे २०२५ चे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाले असून या वर्षीचा "साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे साहित्य भूषण पुरस्कार" युवा साहित्यिक विक्रम शिंदे यांना जाहीर झाला आहे. मराठी साहित्य विश्वात अत्यंत कमी वयात भरीव योगदानासाठी हा पुरस्कार त्यांना दिला जाणार आहे. विक्रम शिंदे यांनी ६ पुस्तकांचं लिखाण आणि अनेक पुस्तकांचं संपादन केलं आहे.

**<u>महावितरणउपोषण</u>**

रास्ता पेठेतील महावितरणच्या पुणे परिमंडळ कार्यालयासमोर दोन दिवसांपासून तांत्रिक कामगारांचं विविध प्रश्नांसाठी आमरण उपोषण सुरु आहे. प्रशासनाकडून ३ ते ४ वर्षापासून प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक होत नसल्याचं कारण देत हे उपोषण सुरु आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ४० तर किमान तापमान २४ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही कमाल तापमानात बदल संभवत नसल्याचं किमान हवामान विभागानं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी ६ वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**